**01.09.2024** प्रभात:मुरली ओम शांती "अव्यक्त बापदादा"

"आशीर्वाद द्या आशीर्वाद घ्या, प्रश्नांचे निवारण करून समस्यांचे समाधान करा"

आज प्रेमाचे सागर बापदादा आपल्या प्रेमस्वरूप मुलांच्या प्रेमापोटी ओढीने भेटण्यासाठी आले आहेत. मुलांनी बोलावले आणि हजूर हाजिर झाले. अव्यक्ति मिलन तर नेहमीच साजरे करत असतात, तरी सुद्धा साकारमध्ये बोलावले तर बापदादा मुलांच्या विशाल मेळाव्यामध्ये पोहोचले आहेत. बापदादांना मुलांचा स्नेह, मुलांचे प्रेम पाहून आनंद होतो आणि मनातल्या मनात चोहो बाजूंच्या मुलांसाठी गाणे गातात - "वाह श्रेष्ठ भाग्यवान मुलांनो, वाह! ईश्वरीय प्रेमास पात्र असलेल्या आत्म्यांनो वाह!" इतके मोठे भाग्य आणि इतक्या साधारण रूपामध्ये सहज प्राप्त होते, असा स्वप्नामध्ये सुद्धा विचार केला नव्हता. परंतु आज साकार रूपामध्ये भाग्याला बघत आहात. बापदादा पाहत आहेत कि दूर बसून देखील मुले मिलन मेळावा साजरा करत आहेत. बापदादा त्यांना पाहून मिलन साजरे करत आहेत. मेजॉरिटी मातांना गोल्डन चान्स मिळाला आहे आणि बापदादांना सुद्धा विशेष शक्तीसेनेला पाहून आनंद होत आहे कि, चार भिंतींच्या आड राहणाऱ्या माता बाबांद्वारे विश्व कल्याणकारी बनून, विश्वाच्या राज्य अधिकारी बनल्या आहेत. बनल्या आहात का बनत आहात, काय म्हणणार? बनल्या आहात ना! विश्वाच्या राज्याचा लोण्याचा गोळा तुम्हा सर्वांच्या हातामध्ये आहे ना! बापदादांनी पाहिले कि ज्या काही माता मधुबनमध्ये पोहोचल्या आहेत त्यांना एका गोष्टीचा खूप आनंद होत आहे, कोणता आनंद होत आहे? कि बापदादांनी आम्हा मातांना विशेष बोलावले आहे. तर मातांवर विशेष प्रेम आहे ना! नशेने म्हणतात - 'बापदादांनी बोलावले आहे. आम्हाला बोलावले आहे, आम्ही का नाही येणार!' बापदादा सुद्धा सर्वांची रुहरिहान (आत्मिक बातचीत) ऐकत राहतात, हा आनंदाचा नशा बघत राहतात. तसे तर पांडव सुद्धा काही कमी नाहीत, पांडवांशिवाय देखील विश्वाच्या कार्याची समाप्ती होऊ शकत नाही. परंतु आज विशेष मातांना पांडवांनी देखील पुढे ठेवले आहे.

बापदादा सर्व मुलांना खूप सहज पुरुषार्थाची विधी ऐकवत आहेत. मातांना सोपे पाहिजे ना! तर बापदादा सर्व मातांना, मुलांना म्हणत आहेत - सर्वात सोपे पुरुषार्थाचे साधन आहे - "फक्त चालता-फिरता संबंध-संपर्कामध्ये येत असताना प्रत्येक आत्म्याला मनापासून शुभ भावनेचे आशीर्वाद द्या आणि दुसऱ्यांकडूनही आशीर्वाद घ्या." भले तुम्हाला मग कोणी काहीही देवो, अगदी शाप जरी दिले तरीही तुम्ही त्या शापाला सुद्धा आपल्या शुभ भावनेच्या शक्तीने आशीर्वादांमध्ये परिवर्तन करा. तुमच्या द्वारे प्रत्येक आत्म्याला आशीर्वादाचा अनुभव व्हावा. त्या वेळेला अनुभव करा जो शाप देत आहे तो या वेळी कोणत्या न कोणत्या विकाराच्या वशीभूत आहे. वशीभूत आत्म्याप्रति अथवा परवश आत्म्याच्या प्रति कधीही शाप निघणार नाही. त्यांच्या प्रति सदैव सहयोग देण्याचा आशीर्वाद निघेल. फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवा कि आपल्याला निरंतर एकच कार्य करायचे आहे - "संकल्पा द्वारे, वाणी द्वारे, कर्मा द्वारे, संबंध-संपर्काद्वारे आशीर्वाद देणे आणि आशीर्वाद घेणे." जर कोणत्या आत्म्याप्रति कोणताही व्यर्थ संकल्प अथवा निगेटिव्ह संकल्प जरी आला तरीही हे लक्षात ठेवा - माझे कर्तव्य काय आहे! जसे कुठे आग लागली आहे आणि आग विझवणारे असतात तर ते आगीला पाहून पाणी टाकण्याचे आपले काम विसरत नाहीत, त्यांना लक्षात राहते कि आम्ही पाणी टाकणारे आहोत, आग विझविणारे आहोत, तसे जर कोणी कोणत्याही विकाराच्या आगीच्या वश कोणतेही कार्य करत असेल जे तुम्हाला चांगले वाटत नाही तरीही तुम्ही तुमचे कर्तव्य लक्षात ठेवा कि माझे कर्तव्य आहे - कोणत्याही प्रकारची आग विझवण्याचे, आशीर्वाद देण्याचे. शुभ भावनांच्या भावनेचा सहयोग देण्याचे. बस्स, एकच शब्द लक्षात ठेवा, मातांना एकच सोपा शब्द लक्षात ठेवायचा आहे - "आशीर्वाद देणे, आशीर्वाद घेणे". मातांनो हे करू शकता ना? (सर्व माता हात उठवत आहेत) करू शकता कि करायचेच आहे? पांडव करू शकता? पांडव म्हणतात - करायचेच आहे. गायन आहे - पांडव अर्थात सदैव विजयी आणि शक्ती सदैव विश्व कल्याणकारी नावाने प्रसिद्ध आहेत.

बापदादांना चोहोबाजूच्या मुलांकडून अजून पर्यंत एक आशा राहिलेली आहे. सांगू, ती कोणती आशा आहे? जाणले तर आहे! टीचर्स तुम्ही जाणले आहे ना! सर्व मुले यथा शक्ती पुरुषार्थ तर करत आहात. बापदादा पुरुषार्थ पाहून स्मित करत आहेत. परंतु एक आशा ही आहे कि पुरुषार्थामध्ये आता तीव्रगति पाहिजे. पुरुषार्थ आहे परंतु आता तीव्रगति पाहिजे. त्याची विधी आहे - 'कारण' शब्द समाप्त व्हावा आणि सदैव 'निवारण' स्वरूप बनावे. कारणे

तर वेळेनुसार बनतातच आणि बनत राहतील. परंतु तुम्ही सर्व ‘निवारण स्वरूप’ बना कारण तुम्हा सर्व मुलांना विश्वाचे निवारण करून सर्वांना, मेजॉरिटी आत्म्यांना निर्वाणधाममध्ये पाठवायचे आहे. तर जेव्हा स्वतःला निवारण स्वरूप बनवाल तेव्हा विश्वाच्या आत्म्यांना निवारण स्वरूपाद्वारे सर्व समस्यांचे निवारण करून निर्वाणधाममध्ये पाठवू शकाल. आता विश्वातील आत्म्यांना मुक्ती हवी आहे तर बाबांद्वारे मुक्तीचा वारसा देणारे निमित्त तुम्ही आहात. तर निमित्त आत्म्यांनो, पहिले स्वतःला भिन्न-भिन्न समस्यांच्या कारणांचे निवारण करून मुक्त बनवाल तेव्हाच विश्वाला मुक्तीचा वारसा देऊ शकाल. तर मुक्त आहात? कोणत्याही प्रकारच्या समस्येचे कारण पुढे येता कामा नये, ‘हे कारण आहे, हे कारण आहे, हे कारण आहे…’. जेव्हा कोणते कारण समोर येते तर कारणाचे सेकंदामध्ये निवारण काढा, हा विचार करा कि, मी जर विश्वाचे निवारण करणारी आहे तर काय स्वतःच्या छोट्या-छोट्या समस्यांचे स्वतः निवारण करू शकत नाही! नाही करू शकत! आता तर आत्म्यांची रांगच तुमच्या समोर लागेल “हे मुक्तिदाता मुक्ति द्या” कारण मुक्तीदात्याची डायरेक्ट मुले आहात, अधिकारी मुले आहात. मास्टर मुक्तिदाता तर आहात ना. परंतु रांगेसमोर तुम्हा मास्टर मुक्तिदात्यांकडून एक अडथळ्याचा दरवाजा बंद आहे. रांग तयार आहे परंतु कोणता दरवाजा बंद आहे? पुरुषार्थामध्ये कमजोर पुरुषार्थाचा, एका शब्दाचा दरवाजा आहे, तो आहे ‘का’. क्वेश्चन मार्क,(?) ‘का’; हा ‘का’ शब्द आता रांगेला समोर आणत नाही. तर बापदादा आता देश-विदेशच्या सर्व मुलांना हि आठवण करून देत आहेत कि तुम्ही समस्यांचा दरवाजा “का”, याला समाप्त करा. करू शकता ना? टीचर्स करू शकता का? पांडव करू शकता? सर्व हात वर करत आहेत कि कोणी-कोणी? फॉरेनर्स तर एव्हररेडी आहेत ना! हो कि नाही? जर ‘हो’ असेल तर सरळ हात वर करा. कोणी असे-असे करत आहेत. आता कोणत्याही सेवा केंद्रावर समस्येचे नामोनिशाण सुद्धा असता कामा नये. असे होऊ शकते का? प्रत्येकाने समजावे की, हे मला करायचे आहे. टीचर्सनी समजावे - हे मला करायचे आहे, स्टुडंटनी समजावे - हे मला करायचे आहे, प्रवृत्तिवाल्यांनी समजावे - मला करायचे आहे, मधुबनवाल्यांनी समजावे - आम्हाला करायचे आहे. करू शकता ना? ‘समस्या’ हा शब्दच समाप्त व्हावा, ‘कारण’ संपून ‘निवारण’ व्हावे, हे होऊ शकते! काय होऊ शकत नाही, जेव्हा पहिल्यांदा स्थापनेच्या वेळी येणाऱ्या सर्व मुलांनी काय प्रॉमिस केले होते आणि करून दाखवले! असंभवला संभव करून दाखवले. दाखवले ना? तर आता किती वर्षे झाली? स्थापनेला किती वर्षे झाली? (६५) तर इतक्या वर्षांमध्ये असंभवपासून संभव होऊ शकत नाही काय? होऊ शकते ना? मुख्य टीचर्स हात वर करा. पंजाब हात वर करत नाही आहेत, शक्य आहे काय? थोडा विचार करत आहेत, विचार करू नका. करायचेच आहे. इतरांबद्दल विचार करू नका, प्रत्येकाने आपला विचार करा, स्वतःबद्दल तर विचार करू शकता ना? इतरांचा विचार सोडा, स्वतःबद्दल विचार करून स्वतःसाठी तर हिम्मत ठेवू शकता ना? की नाही? फॉरेनर्स ठेवू शकता? (हात वर केला) मुबारक आहे. अच्छा, आता जे समजतात, त्यांनी मनापासून हात वर करा, दिखावा म्हणून नाही. असे नाही सर्वजण हात वर करत आहेत तर मी सुद्धा वर करतो. जर मनाने दृढ संकल्प कराल कि ‘कारणा’ला समाप्त करून निवारण स्वरूप बनायचेच आहे, काहीही होवो, सहन करावे लागले, मायेशी सामना करावा लागला, एकमेकांच्या संबंध-संपर्कामध्ये सहन सुद्धा करावे लागले, मला समस्या बनायचे नाहीये. हे होऊ शकते का? जर दृढ निश्चय असेल तर मागे बसलेल्यांपासून ते समोर बसलेल्यांपर्यंतच्या सर्वांनी हात वर करा. (बापदादांनी सर्वांना हात वर करायला सांगितले आणि संपूर्ण दृश्य टी.व्ही. वर पाहिले) चांगले आहे ना एक्सरसाइज झाली! हात यासाठी वर करायला लावतात, जसे आता एकमेकांना पाहून हात वर करण्यामध्ये उमंग येतो ना! असेच जेव्हापण कोणती समस्या आली तर समोर बापदादांना पहा, मनापासून म्हणा - ‘बाबा’, आणि बाबा हजर होतील, समस्या संपून जाईल. समस्या समोरून निघून जाईल आणि बापदादा समोर हजर होतील. “मास्टर सर्वशक्तिमान” आपले हे टायटल नेहमी लक्षात ठेवा. नाहीतर बापदादांनी आता प्रेमपूर्वक आठवण देताना ‘मास्टर सर्वशक्तीवान’ न म्हणता ‘सर्वशक्तिवान’ म्हटले तर चालेल का? शक्तिवान मुलांना प्रेमपूर्वक आठवण, चांगले वाटेल? मास्टर सर्व-शक्तिवान आहात, मास्टर सर्वशक्तिवान काय करू शकत नाहीत! फक्त आपले टायटल आणि कर्तव्य लक्षात ठेवा. टायटल आहे “मास्टर सर्व-शक्तीवान” आणि कर्तव्य आहे “विश्व कल्याणकारी” तर सदैव आपले टायटल आणि कर्तव्य यांची आठवण केल्याने सर्व शक्ती इमर्ज होतील. मास्टर बना, शक्तींचे सुद्धा मास्टर बना, ऑर्डर करा, प्रत्येक शक्तीला वेळेवर ऑर्डर करा. तसे शक्ती धारण करता सुद्धा, आहेत देखील परंतु फक्त कमी हि आहे कि वेळेवर यूज करता येत नाहीत. वेळ निघून गेल्यावर आठवते, असे केले असते तर खूप चांगले झाले असते. आता अभ्यास करा ज्या शक्ती सामावलेल्या आहेत, त्याला वेळेवर यूज करा. जसे या कर्मेंद्रियांना ऑर्डर प्रमाणे चालवता ना, हाताला, पायाला चालवता ना! असे प्रत्येक शक्तीला ऑर्डरने चालवा. कार्यामध्ये लावा. जमा करून ठेवता, कार्यामध्ये कमी लावता. वेळेवर कार्यामध्ये लावल्याने

शक्ती आपले कार्य जरूर करेल. आणि आनंदी रहा, कधी-कधी काही मुलांचा चेहरा थोडा जास्त विचारांमध्ये थोडा जास्त गंभीर दिसून येतो. खुश रहा, नाचा, गा; तुमचे ब्राह्मण जीवन आहेच आनंदाने नाचण्याचे आणि आपले भाग्य आणि भगवंताची गाणी गाण्याचे. तर नाचणारे-गाणारे जे असतात ना ते असे गंभीर होऊन नाचतील तर म्हणतील नाचायला येत नाही. गंभीरता चांगली आहे परंतु अति गंभीरपणा हा थोडासा विचार करण्यासारखा वाटतो.

बापदादांनी आता ऐकवले कि, दिल्लीमध्ये उद्घाटन होत आहे (९ डिसेंबर २००१ ला दिल्ली गुडगांवमध्ये ओम् शांती रिट्रीट सेंटरचे उद्घाटन आहे) परंतु बापदादा आता कोणते उद्घाटन पाहू इच्छितात? ती डेट तर फिक्स करा, ही छोटी-मोठी उद्घाटने तर होतीलच. परंतु बापदादांना उद्घाटन हवे आहे "सर्व विश्वाच्या स्टेजवर बाप समान साक्षात फरिश्ते समोर प्रकट व्हावेत आणि पडदा उघडला पाहिजे". असे उद्घाटन तुम्हा सर्वांना देखील चांगले वाटेल ना! रुहरिहानमध्ये देखील सर्वजण सांगत असतात, बाबा देखील ऐकत राहतात, बस, आता हीच इच्छा आहे - बाबांना प्रत्यक्ष करू; आणि बाबांची इच्छा आहे कि अगोदर मुले प्रत्यक्ष व्हावीत. बाबा मुलांसोबत प्रत्यक्ष होणार. एकटे होणार नाहीत. तर बापदादा ते उद्घाटन पाहू इच्छितात. उमंग सुद्धा चांगला आहे, जेव्हा रुहरिहान करता तर रुहरिहानच्या वेळी सर्वांचा उमंग खूप छान असतो. परंतु जेव्हा कर्मयोगी बनतात तेव्हा मात्र थोडा फरक पडतो. तर माता काय करणार? मोठी झुंड मातांची आहे. आणि मातांना पाहून बापदादांना खूप आनंद होतो. कोणीही मातांना इतके पुढे आणलेले नाही आहे परंतु बापदादा मातांना प्रगती करताना पाहून खुश होतात. मातांचा विशेष हा संकल्प आहे कि, 'जे कोणी करून दाखवले नाही ते आम्ही माता बाबांसोबत करून दाखवणार'. करून दाखवणार ना? आता एका हाताची टाळी वाजवा. माता, सर्व काही करू शकतात. मातांमध्ये उमंग चांगला आहे. काहीही समजले नसले तरी एवढे तर समजले आहे कि, मी बाबांची आहे, बाबा माझे आहेत. एवढे तर समजले आहे ना! 'मेरा बाबा' तर सगळे म्हणतात ना? बस अंतःकरणापासून हेच गाणे गात रहा - 'मेरा बाबा, मेरा बाबा, मेरा बाबा…'.

अच्छा - आता एक सेकंद बापदादा देत आहेत, सगळे अलर्ट होऊन बसा. बापदादांवर सर्वांचे १०० टक्के प्रेम आहे ना! प्रेम तर टक्केवारीमध्ये नाही आहे ना. १०० टक्के आहे? तर १०० टक्के प्रेमाचे रिटर्न देण्यासाठी तयार आहात? १०० टक्के प्रेम आहे ना. ज्यांचे थोडेसे कमी आहे, त्यांनी हात वर करा. बघा, नंतर वाचाल. जर कमी असेल तर हात वर करा. १०० टक्के प्रेम नसेल तर त्यांनी हात वर करा. प्रेमाची गोष्ट बोलत आहेत. (एक-दोघांनी हात वर केला) अच्छा प्रेम नाही आहे, काही हरकत नाही, होईल. जाणार कुठे, प्रेम तर करावेच लागेल. अच्छा, आता सर्वजण अलर्ट होऊन बसले आहात ना! आता सर्वांनी प्रेमाच्या रिटर्नमध्ये एक सेकंद बाबांसमोर अंतर्मुखी होऊन आपल्या स्वतःशी मनापासून, मनामध्ये संकल्प करू शकता की आता आम्ही स्वतःप्रति अथवा इतरांप्रति 'समस्या' बनणार नाही. हा दृढ संकल्प प्रेमाच्या रिटर्नमध्ये करू शकता? जे समजतात - काहीही होऊ देत, काहीही जरी झाले तरीही सेकंदामध्ये स्वतःला परिवर्तन करू, त्यांनी मनामध्ये संकल्प दृढ करा, जे दृढ संकल्प करू शकतात. बापदादा मदत देतील परंतु मदत घेण्याची विधी आहे - दृढ संकल्पाची स्मृति. बापदादांसमोर संकल्प केला आहे, हि स्मृतिची विधी तुम्हाला सहयोग देईल. तर करू शकता? मान हलवा. बघा, संकल्पाने काय होऊ शकत नाही, घाबरू नका, बापदादांची एक्स्ट्रा मदत जरूर मिळेल. अच्छा.

अशा सर्व तीव्र पुरुषार्थी श्रेष्ठ आत्म्यांना, सदैव बाबांच्या प्रेमाचे रिटर्न देणाऱ्या हिम्मतवान मुलांना, सदैव आपल्या विशेषतांच्या द्वारे इतरांना देखील विशेष आत्मा बनविणाऱ्या पुण्य आत्मा मुलांना, सदैव समस्या समाधान स्वरूप विशेष पुढे उडणाऱ्या मुलांना बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

निरोप घेण्याच्या वेळी:- आज विशेष जे मधुबनमध्ये वरती सिक्युरिटीच्या कार्यामध्ये बिझी आहेत, ते बापदादांच्या समोर येत आहेत. यज्ञाची राखणदारी करणाऱ्यांची खूपच मोठी ड्युटी आहे तर राखणदारी करत आहेत, दूर बसून देखील आठवण करत आहेत, तर खास बापदादा जे वरती कोणत्याही सेवेसाठी बसले आहेत, भले ज्ञान सरोवरमध्ये असो, पांडव भवनमध्ये असो, नाहीतर शांतिवनमध्ये जे पण रखवाली करणारे आहेत, त्यांना बापदादा विशेष प्रेमपूर्वक आठवण देत आहेत. सर्व मेहनत खूप चांगली करत आहेत. अच्छा - सर्व देश-विदेशवाल्यांनी, ज्यांनी म्हणून आठवण पाठविली आहे, त्यांनी असे समजा की, आम्हाला विशेष रूपाने बापदादांनी आठवण दिली आहे. अच्छा.

वरदान:- जुने संस्कार आणि संसारा तील नात्यांच्या आकर्षणापासून मुक्त राहणारे डबल लाईट फरिश्ता भव
फरिश्ता अर्थात जुन्या संसाराच्या आकर्षणापासून मुक्त, नात्याच्या रूपामध्ये आकर्षण नसावे, अथवा आपल्या देहाचे किंवा कोणा देहधारी व्यक्तींमध्ये अथवा कोणत्या वस्तूमध्ये आकर्षण नसावे, तसेच जुन्या संस्काराच्या आकर्षणापासून देखील मुक्त - संकल्प, वृत्ति अथवा वाणीच्या रूपामध्ये कोणत्याही संस्काराचे आकर्षण नसावे, जेव्हा अशा सर्व आकर्षणांपासून अथवा व्यर्थ वेळ, व्यर्थ संगत, व्यर्थ वातावरणापासून मुक्त बनाल तेव्हा म्हटले जाईल डबल लाईट फरिश्ता.

सुविचार:- शांतीच्या शक्तीद्वारे सर्व आत्म्यांची पालना करणारेच रुहानी सोशल वर्कर आहेत.

||| ओम शांती |||